# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) ( Formerly Solapur University)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in

ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०


संदर्भ क्र. पुअहसोविसो/२०२२-२३/ 1067 दि. १९/०७/२०२२

## परिपत्रक क्रमांक -56

.सदंर्भ-१) प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक. पुअहोसोविसो/वित्त व लेखा विभाग/ नगदी विभाग/२०२२-२३/३२५ दिनांक २४/६/२०२२ २) प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्रमांक.पुअहोसोविसो/वित्त व लेखा विभाग /नगदीविभाग/२०२२- २३/३३२दिनांक२८/६/२०२२ .

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य / प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलाचे संचालक यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना संदर्भिय पत्रान्वये सर्व आर्थिक व्यवहार हे १००% ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार असल्याने महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी बँक पासबुकची छायांकित प्रत Cancelled Cheque ची छायांकित प्रत देयकासोबत जोडल्यानंतर संबधिताना मानधान/दैनिक भत्त्याची रक्कम ऑनलाईन पध्दतीने आदा करण्यात येणार असल्याबाबत कळविण्यात आले होते. त्यामुळे सदरची बाब सर्व प्रशासकीय विभाग व संकुले तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना कळविले आहे.

त्याअनुषंगाने संलग्नित महाविद्यालयापैकी लेखी/ प्रात्यक्षिक , कॅप परीक्षेचे केंद्र असलेल्या महाविद्यालयाकडून परीक्षेसाठी झालेल्या खर्चाचे देयकांची रक्कम महाविद्यालयास धनादेशाने आदा न करता संदभीर्य परिपत्रकान्वे महाविद्यालयातील परीक्षेकरिता काम केलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना ऑनलाईन पध्दतीने आदा करण्यात येणार आहे. त्यामुळे महाविद्यालयाने परीक्षेच्या काळात काम केलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-याचे मेहनताना, मानधन, दैनिक भत्ता,अदा करण्यात येणारी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असून त्याकरिता महाविद्यालयाने बँक खात्याचा तपशिल तसेच त्याचे बँकपासबुक छायांकित प्रत तसेच Cancelled Cheque ची छायांकित प्रत देयका सोबत जोडण्यात यावी

सबब महाविद्यालयाने लेखी/ प्रात्यक्षिक/ मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रात काम करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची माहिती बँक खाते नंबर ,आयफसीकोड ,बँक शाखा मानधन , तसेच दैनिक भत्ता टी.ए. डी. ए. अदा करावयाचा असेल नमूद केलेल्या माहितीसह देयकाची माहिती रक्कमेसहित सही शिक्क्यानिशी यादी तयार करुन प्रस्तुत विद्यापीठास सादर करावी. त्यानंतर देयकाची रक्कम ज्या त्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना ऑनलाईनव्दारे बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी

20/07/22

(डॉ. शिवकुमार गणपूर)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

165 प्रति, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य / प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलाचे संचालक यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव